**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक १४ ऑगस्ट २०२६**

**ठळक बातम्या**

1. **स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला आज सायंकाळी ७ वाजता राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू देशवासीयांना संबोधित करणार.**
2. **देशातील १ हजार ९७ अधिकारी-कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदके जाहिर; महाराष्ट्रातील 82 अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव.**
3. **जपतलाई आश्रमशाळेतील सर्पदंश प्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडून दखल.**
4. **१ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या सात महिन्यांच्या कालावधीत राज्यभरात 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबवलं जाणार.**
5. **यंदाच्या जनगणनेत नागरिकांना 'जात' विचारली जाणार; सरकारकडून प्रश्नांची अधिसूचना जारी.**

------------------------------------

राष्ट्रपती संबोधन

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज देशवासीयांना संबोधित करणार आहेत. आज संध्याकाळी ७ वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनवरुन हिंदी आणि इंग्रजीतून हा संदेश प्रसारित होईल. राष्ट्रपतींच्या या संदेशाचा प्रादेशिक भाषांमधला अनुवाद रात्री साडेनऊ वाजता आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात येईल. स्वातंत्र्यदिनानिमित्त राजधानी दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या सकाळी सात वाजता ध्वजारोहण होणार आहे. त्यांनतर पंतप्रधान राष्ट्राला संबोधित करतील.

------------------------------------

ध्वजारोहण मनपा

नागपुरात स्वातंत्र्यदिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा उद्या पालक मंत्री चंद्रशेखार बावनकुळे यांच्या हस्ते विभागीय आयुक्त कार्यालय इथं पार पडणार आहे. तर नागपूर महानगरपालिकेतर्फे उद्या सकाळी ८ वाजून ५ मिनिटांनी मनपा

मुख्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम होणार आहे. महापौर निता ठाकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येईल. भारतीय वायुसेनेच्या अनुरक्षण कमान मुख्यालयातर्फे उद्या सायंकाळी साडेचार वाजता नागपूरच्या कविवर्य सुरेश भट सभागृहात विशेष देशभक्तीपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात भारतीय वायुसेनेचा क्रमांक ५ बँड देशभक्तीपर गीतांचं सादरीकरण करेल.

---------------------------------------

82अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय गृह मंत्रालयाकडून देशातील पोलीस, अग्निशमन, नागरी संरक्षण आणि होमगार्ड तसेच सुधारात्मक सेवांमध्ये उल्लेखनीय कार्य बजावणाऱ्या एकूण १ हजार ५७ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदके जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील 82 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश असून, विविध क्षेत्रांत बजावलेल्या उल्लेखनीय सेवेसाठी त्यांचा गौरव करण्यात आला आहे. कर्तव्य बजावताना जीवित आणि मालमत्तेचे रक्षण करणे, गुन्हे रोखणे अथवा गुन्हेगारांना अटक करणे यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल शौर्य पदक प्रदान केलं जातं. यंदा देशभरात एकूण ३०१ शौर्य पदके जाहीर करण्यात आली आहेत. त्यात महाराष्ट्रातील २० पोलीस कर्मचारी आणि १३ अग्निशमन सेवा कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. सेवेतील विशेष उल्लेखनीय कामगिरीबद्दल ९२ राष्ट्रपती पदके जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील 3 पोलीस अधिकारी-कर्मचारी आणि २ सुधारात्मक सेवा कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. तसेच, देशभरात एकूण ६६४ पदके-गुणवत्तापूर्ण सेवेसाठी जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये महाराष्ट्रातील 37 पोलीस कर्मचारी, 2 अग्निशमन सेवा कर्मचारी, ३ नागरी संरक्षण आणि होमगार्ड सेवा कर्मचारी आणि 2 सुधारात्मक सेवा कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

---------------------------------------

फाळणी वेदना स्मृती दिन

आज १४ ऑगस्ट. आजचा दिवस संपूर्ण देशात 'फाळणी वेदना स्मृती दिन' म्हणून पाळला जातो. फाळणीच्या काळात जीव गमावलेल्या नागरिकांच्या स्मृतीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदरांजली वाहत त्यांच्या धैर्याचे स्मरण केलं. फाळणीच्या वेदना सोसलेल्या नागरिकांचा जीवनप्रवास मानवी जिद्द आणि सामर्थ्याची आठवण करून देतो. तसंच हा दिवस देशातील सौहार्द आणि बंधुभाव

जपण्याचा संकल्प अधिक दृढ करो आणि विकसित भारताच्या उभारणीसाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करावे, अशी अपेक्षाही त्यांनी संदेशातून व्यक्त केली.

-------------------------------------

जपतालाई मानाव आयोग

महाराष्ट्रात गडचिरोली जिल्ह्यात जपतलाई आश्रमशाळेमधल्या वसतिगृहात सर्पदंशामुळे झालेल्या तीन विद्यार्थिनींच्या मृत्युप्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं दखल घेतली आहे. या प्रकरणात राज्याच्या मुख्य सचिवांना आयोगानं नोटीस बजावली असून दोन आठवड्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. आश्रमशाळेत खाटांची कमतरता असल्यानं या विद्यार्थिनी जमिनीवर झोपल्या असताना त्यांना सर्पदंश झाला. तीन जखमी विद्यार्थिनींवर रुग्णालयात अद्याप उपचार सुरू आहेत.

-------------------------------------

अंबादास दानवे- गडचिरोली पाहणी

गडचिरोली जिल्ह्यातील जपतलाई आश्रमशाळेत सर्पदंशामुळे तीन विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्यानंतर माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शाळेची पाहणी केली. यावेळी विद्यार्थ्यांसाठी अपुऱ्या निवास, स्वच्छतागृह आणि सुरक्षेच्या सुविधांसह अनेक गंभीर त्रुटी समोर आल्याचा दावा त्यांनी केला. आश्रमशाळांना अनुदान मिळूनही मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याबद्दल त्यांनी आदिवासी विभाग आणि शाळा व्यवस्थापनाला जबाबदार धरत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची उपाययोजना करून शाळा सुरू ठेवावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

-------------------------------------

मानहानी खटला

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्यासंदर्भात केलेल्या मानहानीकारक वक्तव्यांप्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधात दाखल झालेली मानहानीची तक्रार तसंच कनिष्ठ न्यायालयाने बजावलेलं समन्स सर्वोच्च न्यायालयानं आज रद्द केलं. या प्रकरणात आवश्यक मंजुरी घेतली नसल्याचं सांगत न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या पीठाने हे आदेश दिले. महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यात 'भारत जोडो यात्रे'दरम्यान झालेल्या एका सभेत राहुल गांधी यांनी सावरकरांबाबत मानहानीकारक वक्तव्य केल्याचं सांगत त्यांच्याविरोधात तक्रार दाखल झाली होती.

---

खासदार अमर काळे

वर्धा-अमरावतीतील जलजीवन मिशन, सिंचन प्रकल्प आणि ग्रामीण पाणीपुरवठ्याच्या रखडलेल्या कामांबाबत खासदार अमर काळे यांनी दिल्लीत केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांची भेट घेतली. निधीअभावी थांबलेली कामे तातडीने सुरू करण्यासाठी केंद्राचा प्रलंबित निधी आणि कंत्राटदारांची थकीत देयके त्वरित देण्याची त्यांनी मागणी केली.

---

महसूल लोक अदालत

क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून महसूल विभागाने १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या सात महिन्यांच्या कालावधीत राज्यभरात 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. महसूल विभागाने, काल या संदर्भातील शासन निर्णय जारी केला.या अभियानांतर्गत महसूल प्रशासनातील सर्वात खालच्या स्तरापासून ते वरिष्ठ स्तरा पर्यंतच्या अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या सर्व प्रकारच्या महसुली दाव्यांचा आणि अपीलांचा समावेश करण्यात आला आहे.या अभियानादरम्यान दर तीन महिन्यांतून एकदा मंडळ अधिकारी ते जिल्हाधिकारी अशा सर्व स्तरांवर 'महसूल लोक अदालत' आयोजित करणे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना बंधनकारक करण्यात आलं आहे.

---

जनगणना अधिसूचना

सध्या सुरू असलेल्या जनगणनेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी अधिसूचनेद्वारे देशाचे जनगणना आयुक्त आणि महा रजिस्ट्रार यांनी आज राजपत्रात प्रसिद्ध केली आहेत. त्यात नागरिकांना जात नोंदवण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. २०११ मध्ये झालेल्या जनगणनेच्या वेळी केवळ अनुसूचित जाती आणि जमातीच्या नागरिकांना जात नोंदवण्याचा पर्याय उपलब्ध होता. गेल्यावेळेच्या जनगणनेत एकूण २९ प्रश्न नागरिकांना विचारले गेले होते, यावेळी ही संख्या ४० झाली आहे. जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात ही माहिती नागरिकांना विचारली जाईल. यात कोविड लस घेतल्याचे ठिकाण, एकूण बँक खात्यांची संख्या, मोबाईल, आधार, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट आणि वाहन परवाना याचीही माहिती विचारली आहे.

---

तिरंगा पदयात्रा

'हर घर तिरंगा यात्रा' अभियानांतर्गत यवतमाळ शहरात उत्साहात तिरंगा पदयात्रा काढण्यात आली. तिरंगा ध्वज हाती घेऊन मोठ्या संख्येने विद्यार्थी नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी रॅलीत सहभागी झाले. दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळात 'हर घर तिरंगा' अभियानाअंतर्गत विविध रेल्वे शाळा आणि रेल्वे वसाहतींमध्ये देशभक्तिपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. नैनपूर येथील रेल्वे मिश्र उच्च माध्यमिक शाळेच्या सुमारे ४०० विद्यार्थ्यांनी तिरंगा रॅली काढून राष्ट्रीय ध्वजाबाबत जनजागृती केली. अजनी रेल्वे वसाहतीतील लिटल स्टेप स्कूल तसेच मोतीबाग, नागपूर आणि डोंगरगड येथील रेल्वे शाळांमध्येही 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात आले. मध्य रेल्वेच्या नागपूर विभागीय रेल्वे कार्यालयात देखील उत्साहात तिरंगा रॅली काढण्यात आली. यावेळी उभारण्यात आलेल्या 'हर घर तिरंगा' सेल्फी पॉइंटलाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

-------------------------------------

अखंड भारत संकल्प दिन

वंदे मातरम् राष्ट्रगीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आणि अखंड भारत संकल्प दिनानिमित्त नागपुरातील महाल येथे सामूहिक 'वंदे मातरम्' गायनाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात ३४ शाळा-महाविद्यालयांतील पाच हजारांहून अधिक विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक सहभागी झाले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील आणि महापौर नीता ठाकरे यांच्या उपस्थितीत देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

-------------------------------------

हवामान

गोंदिया, भंडारा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यांसाठी प्रादेशिक हवामान विभागाने पुढील काही तासांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. या जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे.

-------------------------------------

इसरो

भंडारा जिल्ह्यातील ४१ विद्यार्थ्यांनी इस्रोचा विशेष अभ्यासदौरा यशस्वीरीत्या पूर्ण करून परतल्यानंतर नागपूर विमानतळावर पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी त्यांचं उत्साहात स्वागत केलं. विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांनी इस्रो भेटीतील अनुभव

जाणून घेतले. या अभ्यासदौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधन, उपग्रह तंत्रज्ञान आणि विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्राची प्रत्यक्ष ओळख झाली असून, भविष्यात संशोधन क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा मिळाल्याचं विद्यार्थ्यांनी सांगितलं.

---------------------------------------